# दिनांक 10/04/2025

**1.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 07:45 वा च्या सुमारास मौजे कुंभारवाडा, बिरवाडी येथील फिर्यादि यांचे फलॅट चे उघडे असलेल्या खिडकीमधून, ता. महाड येथे एकूण 10000/- रुपये व किंमतीचा मोबाइल REALME NARZO मॉडेल हा कोणीतरी अज्ञात ईसम याने फिर्यादी यांचे परवाणगी शिवाय स्वत:च्या फायद्याकरिता लबाडीच्या हेतुने चोरुन नेला.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं.41/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2), 331(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/शेख, हे करीत आहेत.

**2.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास मौजे चोळई गावचे हद्दीतील सायली ढाब्यासमोरील मुंबई गोवा हायवे रोडवर ता.पोलादपूर येथे फिर्यादि यांच भाउ हा युनिकॉर्न मोटार सायकल नं एम एच 03 डी एल 7549 ही वरुन चेंम्बुर मुंबई येथुन स्वत: (राकेश दत्ताराम कदम) रा.सुमन नगर समर्थ नगर पंचमुखी चेम्बुर मुबई चालवित मुंबई गोवा हायवे रोडने येत असताना मौजे चोळई गावचे हद्दीतील सायली ढाब्याच्या समोरील रोडवर आलेवेळी मोटारसायकल अविचाराने व हयगईन अतिवेगात बेदरकारपणे चालविल्याने मोटार सायकलवरील ताबा सुटुन गाडि रोडच्या उजव्या बाजुस असलेल्या डिव्हायडरला ठोकर मारुन अपघात करुण अपघातात स्वत:च्या लहाण मोठया तसेच छातीस उजवे बाजुस बरगडयांना गंभीर दुखापती होवुन स्वत:चे मरणास व गाडिचे नुकसानिस कारणीभुत झाला.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं. 20/2025 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/संग्राम बामणे, हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/01/2025 रोजी 00:00 वा ते दि. 11/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान आरोपीत याने महिला फिर्यादी (पिडीत महीला) हीला लग्नाचे अमिश दाखवुन वांरवार तीचे बरोबर शारीरिक संबध ठेवुन तीस गरोदर होण्यास कारणीभुत झाला.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं. 59/2025, BNS 64(2),(N) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई प्राची पांगे,ह्या करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे तहसील कार्यालय खालापुर येथे महिला फिर्यादी यांचे कॅबिन मध्ये ता.खालापुर, येथे महिला फिर्यादी या तहसील खालापुर येथे नेमणुकीस असुन माहीती अधिकारा संबंधी कामकाज पहातात आरोपीत क्र 1 याचे माहीती अधिकार अंतर्गत अपिलाचे कामकाज, फीर्यादी यांचेकडे असल्याने आरोपीत 1. व त्याचे इतर दोन मित्र हे फीर्यादी यांचेकडे आले होते परंतु प्रथम अपिली अधिकारी हे शासकीय कामा निमीत्त बाहेर असल्याने त्याना येण्यास उशीर होइल ते आल्यानंतर सुनावणी सुरु करु असे आरोपीत यांना सांगीतले असता आरोपीत हे फिर्यादी यांच्या टेबल जवळ येउन त्या करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा आणण्याकरीता फीर्यादी यांच्या दिशेने हातवारे करुन तुम्हाला माहीती दयायची आहे की नाही ,मी तुमची तक्रार वरीष्टांकडे करीन तुम्हाला खुप अॅटीटयुड आहे असे बोलुन त्याचे मोबाइल मध्ये शुर्टीग करुन दबाव टाकुन त्यांचे टेबलवर हात ठेउन शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.121/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 132,221,3(5) 132,221,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसइ/सरिता मनवर करीत आहेत.

**5.** पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/04/2024 रोजी 00:00 वा ते दि. 26/03/2024 रोजी 00:00 वा च्या दरम्यान महिला फिर्यादी यांची पिडीत मुलगी हीस आरोपीत याने ती अल्पवयीन आहे हे माहीत असताना देखील तीस प्रेमपत्र दिले तसेच ती घरातून शाळेत जात असताना तिचा रस्ता अडवून वारंवार पाठलाग करून वारंवार त्रास दिला.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.34/2025, BNS 78, बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 चे कलम 12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/मोहीते करीत आहेत.

**6.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक08/04/2025 रोजी 23:30 वा च्या सुमारास मौजे आकुर्ले येथील सिध्दीविनायक हाईटस बिल्डींगच्या पार्कींग मधून फिर्यादी यांची एकूण 1,80,000/-रू व किंमतीची अॅटो रिक्षा क्र एम एच 46 बीडी 9224 ही मौजे आकुर्ले येथील सिध्दीविनायक हाईटस या बिल्डींग खाली पार्क केली असता कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादी यांचे संमतीशीवाय स्वत:च्या फायदया करीता लबाडीच्या हेतूने चोरून नेली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.99/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/स्वप्नील येरुणकर करीत आहेत.

**7.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/04/2025 रोजी 03:30 वा च्या सुमारास मौजे म्हसळा ते माणगाव बायपास रोडवर, ता.म्हसळा, येथे आरोपीत चालक रा.पानवे ता.म्हसळा यांनी त्याचे ताब्यातील हायवा एएमडब्ल्यु हायवा क्र.एमएच 06बीडी 0604 हे वाहन रत्याच्या

परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात, हयगयने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे रा.पानवे ता.म्हसळा ताब्यातील आयसर कंम्पनीचा हायवा डंम्पर क्र.एम एच 12 एक्स एम3693 यास चालक साइडने जोराचे धडक देउन अपघात करुन दोन्ही वाहनाचे नुकसानीस तसेच स्वत:चे दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं. 22/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 281,125(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/बांगर करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 09.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 46 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 38,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.